**<u>ठळक बातम्या</u>**

- विश्व मराठी साहित्य संमेलनात दिल्या जाणाऱ्या साहित्यभूषण पुरस्काराची रक्कम यंदापासून १० लाख रुपये करण्याची मराठी भाषा मंत्र्यांची घोषणा

- राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या दृष्टीनं भाजपाकडून राज्यभरात एकूण १ हजार २२१ मंडळं गठित

- फ्रान्समधे होणाऱ्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर', 'खालिद का शिवाजी' आणि जुनं फर्निचर या चार मराठी चित्रपटांची निवड

**आणि**

- आयपीएलमधे मोहाली इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा पंजाब किंग्जवर ७ गडी राखून विजय, तर मुंबईत थोड्याच वेळात मुंबई इंडीयन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांची लढत

**<><><><><><>**

विश्व मराठी साहित्य संमेलनात दिल्या जाणाऱ्या साहित्यभूषण पुरस्काराची रक्कम या वर्षीपासून १० लाख रुपये केली जाणार असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज केली. त्यांच्या उपस्थितीत रत्नागिरी तालुक्यातलं मालगुंड, हे पुस्तकांचं गाव म्हणून घोषित करण्यात आलं. या लोकार्पण सोहळ्यात तो बोलत होते. मालगुंडच्या कवी केशवसुत स्मारकाच्या नूतनीकरणासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही त्यांनी केली. कोकणानं महाराष्ट्राला जेवढे साहित्यिक दिले, तेवढे कोणत्याच प्रांतानं दिले नाहीत, असे गौरवोद्गार सामंत यांनी यावेळी काढले. ते म्हणाले..

**होल्ड - बाईट - उदय सामंत**

कोकणातल्या साहित्यिकांची माहिती देणाऱ्या कोकणसाहित्य सन्मान दालनाचं उद्घाटनही या वेळी झालं. या उपक्रमात मालगुंडमधल्या ३०, तर जवळच्या गणपतीपुळे गावातल्या पाच घरांचा समावेश केला आहे. या घरांमध्ये पुस्तकं ठेवली जाणार आहेत.

**<><><><><>**

नागपूर इथं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत महिलांना पिंक ई-रिक्षा वितरण करण्यात आलं. भविष्यात दोन हजार महिलांना ई रिक्षांचं वितरण करत त्यांना रोजगार मिळवून देण्याचा उद्देष्य असल्याचं मुख्यमंत्री फडनवीस यांनी यावेळी सांगितलं. नागपूरमधल्या विविध मेट्रो स्थानकांवर फिडर सर्व्हिस म्हणून या पिंक रिक्षा ठेवण्यासंदर्भात मेट्रो प्रशासनाशी करार केला जाणार आहे, असं ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी नागपूरमध्ये हैदराबाद हाऊस इथं आज जनता दरबार घेतला. यावेळी नागपूर-विदर्भातल्या नागरिकांनी त्यांच्या समस्या मांडल्या. विविध कार्यक्रमांमध्ये, तसंच हैदराबाद हाऊसमधल्या मुख्यमंत्री सचिवालयात प्राप्त होणारे जनतेचे अर्ज आणि निवेदनांवर कार्यवाही होवून अर्जाची सद्यास्थिती अर्जदाराला एसएमएसद्वारे कळण्यासाठी पीजीआरएस, ही तक्रार निवारण व्यवस्थेची ऑनलाईन प्रणाली लवकरच कार्यान्वित होणार आहे. तिचं सादरीकरण आज फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात आयोजित बैठकीत करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या दृष्टीनं भाजपानं महाराष्ट्र प्रदेश संघटनेत एकूण १ हजार २२१ मंडळं स्थापन केली आहेत. त्यातली २५८ मंडळं नव्यानं स्थापन केली गेली आहेत. त्यापैकी ९६३ मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाची जनाधारावर आधारित शक्ती वाढवण्याचा हा प्रयत्न असल्याचं पक्षाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यात काँग्रेसच्या दोन नेत्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. भोर विधानसभा मतदारसंघातले माजी आमदार संग्राम थोपटे यांनी पक्षसदस्यत्वाचा राजीनामा दिला असून भाजपामधे प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. अहिल्यानगर इथं आज कार्यकर्त्यांबरोबर बैठक घेतल्यानंतर ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. आपल्याला पक्षात डावललं जात असल्यानं येत्या मंगळवारी आपण भाजपात प्रवेश करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनीही पदाचा आणि पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे पाठवला आहे.

<><><><><>

राज्यातल्या शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न आणि हिंदी भाषा सक्तीची करण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. त्या आज पुण्यात बातमीदारांशी बोलत होत्या. केंद्र सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण राज्यात रेटून नेण्याचा प्रयत्न सुरु आहे. एसएससी बोर्डाचा अभ्यासक्रम सर्वोत्तम आहे, सीबीएसईचा पर्याय द्या, मात्र सक्ती करू नका. मराठी भाषा प्रत्येकाला आली पाहिजे, हिंदी किंवा अन्य भाषा पर्याय म्हणून ठेवा, असं त्या म्हणाल्या.

दरम्यान, या मुद्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांना खुलं पत्र लिहिलं आहे. ज्या पद्धतीनं सरकार हिंदी भाषेची सक्ती करत आहे, त्यामुळे हिंदू समाज एकत्र येण्याऐवजी विखुरण्याचीच शक्यता अधिक असल्यानं याला चाप लावावा, असं आवाहन त्यांनी या पत्रात केलं आहे.

<><><><><>

ईस्टर म्हणजेच प्रभू येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाचा दिवस आज सर्वत्र भक्तीभावात साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी यानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईस्टरनिमित्त ठिकठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थनेसह अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं.

हा सण नव्या आशा आणि नव्या प्रारंभाची प्रेरणा देतो असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. प्रभू येशू ख्रिस्तांची मानवता, करुणा आणि सेवा यांची अजरामर शिकवण सौहार्दपूर्ण सामाजिक जीवनासाठी मार्गदर्शक असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी य़ांनी ईस्टरनिमित्त दिलेल्या शुभेच्छांमधे सर्वांना आनंद आणि सलोख्याची कामना केली आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही राज्यातल्या जनतेला इस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

फ्रान्समधे होणाऱ्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर','खालिद का शिवाजी' आणि जुनं फर्निचर या चार मराठी चित्रपटांची निवड झाली आहे. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळानं आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही माहिती दिली.

फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे २०२५ या कालावधीत कान चित्रपट महोत्सव होत आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मोहाली इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं पंजाब किंग्जवर ७ गडी राखून विजय मिळवला.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्जनं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून १५७ धावा केल्या. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं ३ गड्यांच्या मोबदल्यात सामन्यातले ७ चेंडू बाकी असताना ही धावसंख्या पार केली. देवदत्त पडिक्कलच्या ३५ चेंडूत ६१, आणि विराट कोहलीच्या नाबाद ७३ धावांच्या खेळीमुळे हा विजय सोपा झाला. या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना मुंबई इंडीयन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होणार आहे. मुंबईतल्या वानखेडे स्टेडिअमवर थोड्याच वेळात साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. मुंबई इंडीयन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

राष्ट्रीय पोषण पंधरवड्यानिमित्त वाशिम जिल्ह्यात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. यातल्या लाभार्थी नेहा प्रफुल्ल झाटे यांनी सांगितलं..

**होल्ड - बाइट - नेहा प्रफुल्ल झाटे**

**<><><><><>**

रोजगार हमीच्या कामांची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक उद्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. पैठण तालुक्यातल्या ११० गावांपैकी ३० गावांची हे पथक तपासणी करणार आहे. अभिलेखे, सोई सुविधा उपलब्ध आहेत की नाही याची चौकशी या दौऱ्या अंतर्गत केली जाणार असल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

**<><><><><>**

अहिल्यानगर-बीड-परळी या रेल्वेमार्गावर बीड ते वडवणी या मार्गावर रेल्वे इंजिन चाचणी आज सुरू झाली. बीड रेल्वे स्थानकावरून आज सकाळी रेल्वे इंजिन बीडहून वडवणीकडे निघालं. इंजिनाला जोडलेल्या मालगाडीत नवीन रेल्वे

रूळ आणि रॅक वाहून नेले. या मार्गावर पहिल्यांदाच रेल्वे धावत असल्यानं इंजिन पाहण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या नियोजित सौदी अरेबिया दौऱ्यासाठी परवा मंगळवारी जेद्दाह इथं पोहोचतील. भारताच्या प्रधानमंत्र्यांची या शहराला गेल्या जवळपास चार दशकांतली ही पहिलीच भेट असणार आहे.

**<><><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी कमाल किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान नागपूर इथं ४४ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची, तर विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><><>//**